# कृतज्ञता रथयात्रेचे देगलूर महाविद्यालयात स्वागत...!




देशोन्नती वृत्तसंकलन...

**देगलूर** ▪ अखिल भारतीय विद्यार्थी परिषद देवगिरी प्रदेश आयोजित मराठवाडा मुक्तीसंग्राम कृतज्ञता रथयात्रेचे ४ सप्टेंबर रोजी देगलूर महाविद्यालयात कलश पुजन करून स्वागत करण्यात आले.

'आठवण इतिहासाची कृतज्ञता मराठवाडा मुक्ती संग्रामाची' या अंतर्गत मराठवाडा मुक्ती संग्राम हा मराठवाड्याच्या गावागावात लढला गेला होता. ज्यांनी जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी संग्रामामधे पुढाकार घेतला याची जाणीव शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्हावी, या भूमिकेतून देवगिरी प्रदेश अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने १ ते १७ सप्टेंबर या कालावधीत मराठवाडा मुक्ती संग्राम कृतज्ञता रथयात्रेचे संपूर्ण मराठवाड्यात आयोजन करण्यात आले आहे. ४ सप्टेंबर रोजी देगलूर महाविद्यालयात कृतज्ञता रथयात्रा क्रमांक २ चे आगमन झाले. यावेळी या रथांमधील कलश पुजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांच्या हस्ते करून रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी रथयात्रेच्या पाठीमागची भूमिका नांदेडचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संघटन मंत्री शुभम स्वामी यांनी सांगीतली.

सोबत अ.भा.वि.प.चे श्रीनिवास ऊईके, इंद्रजीत बामणे होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, अधिक्षक गोविंद जोशी, क. म. उपप्राचार्य प्रा. उत्तम कुमार कांबळे, प्रा. डॉ. संतोष येरावार प्रा. डॉ. विठ्ठल जम्बाले, डॉ. सुनेवार, डॉ. पोकलवार, प्रा. कपिल तोटावार, प्रा. नरवाडे, गुडूसाब, प्रा.महेश कुलकर्णी, प्रा. शिवचरण गुरूडे, प्रा. संतोष वानोळे, प्रा. हणमंत वाकडे; प्रा. शिवानंद सुर्यवंशी प्रा.रत्नाकर चिद्रावार, प्रा. मल्लूरवार आदी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. विनय भोगले यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner